N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गोंदिया **P.S.**(ठाणे): गोंदिया शहर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0320 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 09/07/2019 18:49 बजे

2. **S.No.** (अ.क्र.) **Acts** (अधिनियम) **Sections** (कलम)

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी): पहर 6

**Date From** (दिनांक पासून): 05/07/2019
**Date To** ( दिनांक पर्यंत): 05/07/2019
**Time From** (वेळेपासून): 15:29 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:10 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 09/07/2019 **Time** (वेळ): 18:27 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद 039 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 09/07/2019 18:27 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 0.3 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): नगरपरिषद गोंदया ,गोंदिया

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री कैलासचद्र श्रीकष्ण असाटी
(b) **Father's Name** (वडील का नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म 1953 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):
**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

# फिर्याद

ला.प्र.वि. गोंदिया
दिनांक ०९.०७.२०१९

नाव :— श्री. कैलाशचंद्र श्रीकृष्ण असाटी, वय ६६ वर्षे, व्यवसाय — जीवन बिमा एजंट, रा. विजय मेडीकलच्या मागे, लोहीया वार्ड, कुडवा, गोंदिया, मो.क्र.९८२३५८७९६९/ ८९९९५६३३३९

मी वर नमुद पत्यावर परिवारासह राहत असुन जीवन विमा एजंट म्हणुन काम करतो. माझे मौजा कुडवा येथे गट क्र. ५७४/३ व ५७५/३२ मध्ये माझ्या मालकीचा १७९७ चौरस फुटाचा प्लॉट आहे. सदर प्लॉटचा दि. २४.११.१९८६ रोजी मा. अपर तहसिलदार, गोंदिया यांचेकडुन अस्थायी अकृषीक परवाना (Temparary N.A.) प्राप्त केलेला आहे.

माझ्या मालकीच्या प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना प्राप्त करण्याच्या अनुषंगाने मी माहे एप्रील २०१९ मध्ये श्री. शशि पारधी, कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग, नगर परिषद, गोंदिया यांची भेट घेवून त्यांचेकडे आवश्यक ती कागदपत्रे सादर केली. त्यावेळी त्यांनी मला स्थायी अकृषीक परवान्याचे काम करून देण्याकरीता शासकीय शुल्क रू. २०,०००/— व इतर रू. २०,०००/— असे एकुण रू. ४०,०००/— लागतील असे सांगीतले. त्यानुसार मी शासकीय शुल्क रू. २०,६७०/— वेळोवेळी नगर परिषद, गोंदिया येथे भरलेले आहेत.

मी दि. ०१.०७.२०१९ रोजी श्री. शशि पारधी, कनिष्ठ अभियंता यांचेकडे जावून माझ्या प्लॉटच्या स्थायी अकृषीक परवान्याचे काम झाले किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता त्यांनी माझ्याकडे रू. २०,०००/— ची मागणी करून पैसे दिल्याशिवाय तुमचे काम होणर नाही असे सांगीतले. त्यामुळे मी त्यांना नाइलाजाने माझ्याजवळील रू. १२,०००/— देवून उर्वरीत रू. ८,०००/— नंतर आणुन देतो असे सांगतिले. त्यानंतर मी दि. ०४.०७.२०१९ रोजी श्री. शशि पारधी, कनिष्ठ अभियंता यांना माझ्या कामासंबंधी भेटलो असता, जोपर्यंत तुम्ही रू. ८०००/— आणुन देणार नाहीत, तोपर्यंत तुमचे काम होणार नाही, असे सांगुन माझ्याकडे रू. ८,०००/— लाचेची मागणी केली. अशा आशयाची तक्रार मी दि.०५.०७. २०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत श्रीराम पाटील, ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत श्रीराम पाटील यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंटआउट काढुन त्यावर माझी सही घेतली.

तद्नंतर पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन त्यांची ओळख आमच्याशी करुन दिली. पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यानी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचावयास दिली. पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर त्यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली. त्यानंतर

समक्ष

शशिकांत पाटील
पोलीस निरीक्षक 09/7/19
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया

KCAsati
09-07-19

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विजय मेडीकल,मागे लोहीया वार्ड,कुडवा ,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | विजय मेडीकल,मागे लोहीया वार्ड,कुडवा ,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9823587969

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री शशी छोटेलाल पारधी | | | 1. डव्वा पोस्ट कारंजा ,ता गोरेगांव गोंदिया, गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री सचिन गोविंद शेन्डे | | | 1. शेन्डे सदन, साई नगर,,मरारटोली ,ताजि गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

पंचनामा कार्यवाही केलानंतर

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):

प्रकरण अशा प्रकारे आहे की, वर नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र1)श्री शशी छोटेलाल पारधी वय 24 वर्ष रा. डव्वा पोस्ट कारंजा ता. गोरेगाव जि. गोंदिया व्यवसाय-नोकरी (कत्राटी, कनिष्ठ अभियता,नगररचना विभाग, नगर परिषद गोंदिया) यानी दि. 05/07/019रोजी वेळ 15/29वा. ते 16/10वा. नगर परिषद गोंदिया येथे लाच मागणी पडताडणी कार्यवाही दरम्यान आपले पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदारचे मौजा कुडवा येथील गट क्र 574/3 व 575/32मध्ये त्याचा मालकीचा 1797चौरस फुट प्लटचा स्थायी अकृषिक परवाना (Permenent N.A.) काढुन देण्याकरिता रु.8000/-लाच रकमेची तक्रारदाराकडे मागणी करुन प्राप्त करण्याचा प्रयत्न केला तसेच दि. 08/07/019रोजी वेळ 12/36वा. ते14/17 वा. लाचेचा सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र 2)श्री सचिन गोंविद शेन्डे वय 38वर्ष रा. शेन्डे सदन, साईनगर, मरारटोली ता.जि. गोंदिया(सभापती-नियोजन व विकास नगर परिषद गोंदिया) यांनी मौजा कुडवा येथील गट क्र 574/3व 575/32 मध्ये तक्रारदाराचा मालकीचा 1797 चौरस फुट प्लटचा स्थाथी अकृषिक परवाना (Permenent N.A.)तैयार करुन तक्रारदारास आणुन दिला म्हणुन तक्रारदारा कडे रु.8000/-लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे लेखी तक्रारीवरुन सदर गुन्हा दाखल करुन तपासात घेतला

पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ १५.२९ वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. १ व माझा आवाजात पडताळणी करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डरसह मला पंच क्रमांक १ श्री. सागर पाटील यांचेसोबत माझे खाजगी मोटार सायकलने नगर परिषद गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. नगर परिषद गोंदिया येथे गै.अ. शशि पारधी, कनिष्ठ अभियंता यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्या मौजा कुडवा येथील प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना ( Permenent N. A.) काढुन देण्याकरीता माझ्याकडे रु. ८,०००/— लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व ती लाच रक्कम सोमवार दि. ०८.०७.२०१९ रोजी आणुन देण्यास सांगितले. त्यानंतर वेळ १६.१० वा. मी पंच क्र. १ यांच्यासह ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. १ यांच्या आवाजात बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन गै.अ. श्री शशि पारधी यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्याकडे रु. ८,०००/— लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी पुढील सापळा कार्यवाही दि. ०८.०७.२०१९ रोजी करण्याचे ठरवुन मला दि. ०८.०७.२०१९ रोजी १०.०० ला.प्र.वि., गोंदिया येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. या कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांचे सुचनेनुसार मी दि. ०८.०७.२०१९ रोजी १०.०० वा ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात हजर आलो. पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. ८,०००/— त्यांच्याकडे जमा केली. त्यानंतर पंच क्र. १ यांच्याहस्ते माझी अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या अॅथ्रासीन पावडरची वैशिष्ट सांगुन त्या नोटांना अॅथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते करुन दाखविले. त्यानंतर अॅथ्रासीन पावडर लावलेल्या रू. ५००/— दराच्या १६ नोटा असे एकुण रू. ८,०००/— माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर वेळ १२.३६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ व माझ्या आवाजात सापळा कार्यवाहीकरीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व व्हाईस रेकॉर्डरसह मला पंच क्रमांक १ श्री. सागर पाटील यांचेसोबत माझे खाजगी मोटार सायकलने नगर परिषद, गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. नगर परिषद गोंदिया येथे गै.अ. श्री. शशि पारधी हे हजर मिळाले. त्यावेळी गै.अ. श्री. शशि पारधी यांनी मला थोडा वेळ थांबण्यास सांगीतले. थोड्या वेळाने ते एका इसमासोबत आले. त्यांनी त्या इसमाशी माझी भेट करुन दिली व मला 'अंकल, भैया के साथ मे चले जाओ, फाईल भी है,

समक्ष

PI
शशिकांत पाटील
पोलीस निरीक्षक 09/7/19

RcAsati
09-07-

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

13. Action  Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Umesh Mohanrao Patil(I (Inspector)) / or

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे  Rank (पद):

No.(क्र.):  to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

RcAsati 09-07-19

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

FIR ची प्रत मला मिळाली
RcAsati
09-07-19

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

sunil meshram/1796

Name (नाम): Umesh Mohanrao Patil

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):

स्टे.डा.अंमलदार
पोलीस स्टेशन गोंदिया शहर

ऑर्डर दे देंगे आपको, असे म्हटले. त्यावेळी मी गै.अ. श्री पारधी यांना आर्डर तुम्हीच आणुन द्या असे बोललो. त्यावर गै.अ. श्री पारधी यांनी तुम्हाला जावा लागेल, असे सांगीतले. त्यानंतर त्या इसमाने मला मोटार सायकल घेवुन गांधी प्रतिमा येथे येण्यास सांगीतले. त्यानुसार मी पंच क्र. १ सह गांधी प्रतिमा जवळ जावुन थांबलो. इतक्यातच श्री सचिन शेंडे यांचा माझ्या मोबाईलवर फोन आला, त्यावेळी त्यांनी मला घरी जाण्यास सांगुन ते घरी येत असल्याचे कळविले. सदर बाबत मी पोलीस निरिक्षक श्री शशिकांत पाटील, ला.प्र.वि, गोंदिया यांना माहीती देवुन पंच क्र. १सह माझे राहते घरी जावुन थांबलो.

त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री शशिकांत पाटील, ला.प्र.वि, गोंदिया हे सापळा पथकासह माझे मागोमाग आले.थोड्या वेळाने श्री सचिन शेंडे हे मोटारसायकलने एका ईसमासोबत माझ्या घरी आले. त्यावेळी त्यांनी माझ्या मौजा कुडवा येथील प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना (Permenent N.A.) व नकाशा मला देवुन माझ्याकडे रु. ८,०००/– लाच रकमेची मागणी केली. त्यावेळी मला त्यांना पैशे दयावयाचे नव्हते म्हणुन पैशे नसल्याचे सांगितले. त्यानंतर श्री सचिन शेंडे हे निघुन गेले. त्या दरम्यान ी लाच रक्कम स्विकारण्यासंबंधी कोणताही नियोजीत ईशारा न केल्याने पोलीस निरिक्षक श्री पाटील हे पंच क्र. २ व सापळा पथकासह माझ्याजवळ आले. त्यानंतर वेळ १४.१७ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला. तद्नंतर मी व पंच क्र. १ पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात आलो. पोलीस निरिक्षक श्री शशिकांत पाटील यांनी माझ्या खिशातील लाच रक्कम रू. ८,०००/– आपले अधिनस्थ कर्मचाऱ्याचे हस्ते काढुन घेतले.

त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांना घडलेली हकिकत पंचासमक्ष सांगितली. पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन श्री. सचिन शेंडे यांनी माझ्या प्लॉटचे स्थायी अकृषीक परवान्याचे काम करून दिले म्हणुन माझ्याकडे रू. ८,०००/– ची लाचेची मागणी करून ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यानंतर श्री सचिन शेंन्डे यांनी माझ्या मौजा कुडवा येथील प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना (Permenent N.A.) व त्यासोबतच्या नकाशाची छायांकीत प्रत पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी माझ्याकडुन जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करुन पुढील सापळा कार्यवाही करीता दि. ०९.०७.२०१९ रोजी सकाळी १०.०० ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. या कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस निरीक्षक श्री.शशिकांत पाटील यांचे सांगण्यानुसार मी दि.०९.०७.२०१९ रोजी १०.०० वा ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात हजर येवुन पंचासमक्ष कळविले की, आज दि. ०९.०७.२०१९ रोजी सकाळी ०७.४५ वा सुमारास श्री सचिन शेंन्डे हे माझ्या राहत्या घरी आले. मी त्यांना घाबरून या सापळा कार्यवाहीची सर्व खरी हकिकत त्यांना सांगितली. त्यावरून गै.अ.

समक्ष

PI
शशिकांत पाटील
पोलीस निरीक्षक
09/7/19

09/07/19

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Burn Mark | Place Of (का स्थान) Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

श्री. शशि पारधी व श्री. सचिन शेंडे हे त्यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम माझ्याकडुन स्विकारणार नाहीत, याची मला पुरेपुर खात्री झाल्याने त्यांच्याविरूध्दची सुरु असलेली सापळा कार्यवाही थांबविण्यात यावी. अशी विनंती केली. त्याबाबत पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी माझा सविस्तर जबाब नोंदवुन त्याबाबतच्या सविस्तर नोंदी त्यांनी पंचनामा क्र. ३ मध्ये घेतल्या आहेत.

गै.अ. क्र. १) श्री. शशि छोटेलालजी पारधी, वय २४ वर्षे, पद—कनिष्ठ अभियंता (कंत्राटी), नगर रचना विभाग,नगर परिषद, गोंदिया यांनी माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारली नसली तरी त्यांनी दि. ०५.०७.२०१९ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान आपले पदाचा दुरूपयोग करून त्यांनी माझा मौजा कुडवा येथे गट क्र.५७४/३ व ५७५/३२ मध्ये माझ्या मालकीचा १७९७ चौरस फुट प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना (Permenent N.A.) काढुन देण्याकरीता रु. ८,०००/— लाच रकमेची मागणी करुन प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. तसेच दि. ०८.०७.२०१९ रोजी लाचेच्या सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. क्र. २) श्री सचिन गोंविंद शेंडे, वय ३८ वर्ष, नियोजन व विकास सभापती, नगर परिषद, गोंदिया यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन त्यांनी मौजा कुडवा येथे गट क्र. ५७४/३ व ५७५/३२ मध्ये माझ्या मालकीचा १७९७ चौरस फुट प्लॉटचा स्थायी अकृषीक परवाना (Permenent N.A.) तयार करुन माझ्याकडे आणुन दिला म्हणुन माझ्याकडे रु. ८,०००/— लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत टंकलिखीत करुन प्रिंटआऊट काढुन मला वाचण्यास दिली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

09/7/19

शशिकांत पाटील
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया

RCAsati 09/07/19

( कैलासचंद्र श्रीकृष्ण असाटी )